Kisan Shikshan Sanstha's

KRANTISINH NANA PATIL MAHAVIDYALAYA, WALWA DIST. – SANGLI

Cultural, Youth Festival And Debate Committee

2023-2024

A Brief Report

| | |
|---|---|
| Name of the Committee | : Cultural, Youth Festival and Debate Committee |
| Activity | : Padmabhuahan Krantiveer Dr. Nagnath Anna Nayakawadi Jayanti Samaroh |
| Date | : 15/07/2023 |
| Subject | :- Krantiveer Dr Naganath Anna's Role in Indian Freedom |
| Chairperson | :- Hon. Dr S. A Nayakawadi [ The Principal ] |
| Number of Staff Benefited | : 34 |
| Place | : K. N . P. College |

The Chairperson Hon. Dr S. A Nayakawadi pointed out that Krantiveer Annasaheb spent his complete life for the real freedom of the common man and she also focused on the contribution of Annasaheb for the development of farmers and workers in both pre and post independence era . At last . Mr. R J Patil offered vote of thanks of the function.

Chairman
Cultural, Youth Festival And Debate Committee

KRANTISINH NANA PATIL COLLEGE DIST. SANGLI ESTA. 1983 WALWE

PRINCIPAL,
KRANTISINH NANA PATIL COLLEGE,
WALWE, DIST. SANGLI.


KEEP
SILENCE
प्रवेश
प्रक्रिया
GPS Map Camera
Walwa, Maharashtra, India
29G8+VF8 Ground Hutatma Kishana Aaahir Vidyalay, Walwa, Maharashtra 416313, India
Lat 17.02756°
Long 74.366061°
15/07/23 11:08 AM GMT +05:30
Google


SILENCE
प्रवेश
प्रक्रिया
GPS Map Camera
Walwa, Maharashtra, India
29G8+VF8 Ground Hutatma Kishana Aaahir Vidyalay, Walwa, Maharashtra 416313, India
Lat 17.02756°
Long 74.366061°
15/07/23 11:08 AM GMT +05:30
Google

## डॉ. भालचंद्र मुणगेकर : वाळव्यात क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी जयंती

# देशाची वाटचाल अराजकतेकडे सुरू




**वाळवा :** क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांच्या जयंतीच्या कार्यक्रमात बोलताना डॉ. भालचंद्र मुणगेकर. व्यासपीठावर बाळासाहेब थोरात, विश्वजित कदम, गोपाळ गुरू, विशाल पाटील, वैभव नायकवडी.

**वाळवा, ता. १५ :** 'देशाची वाटचाल अराजकतेकडे सुरू आहे. आगामी लोकसभा निवडणूक म्हणजे देशाच्या लोकशाहीचे रक्षण करण्याची शेवटची संधी आहे. त्यामुळे जागे व्हा, नाहीतर लोकशाहीचा नाश अटळ आहे,'' असा इशारा ज्येष्ठ विचारवंत, माजी खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी आज येथे दिला.

'देशातील सगळे घटक संकटात आहेत. विभाजनवादी राजकारण देशाचे तुकडे करू पाहत आहे. त्यामुळे देशाच्या रक्षणासाठी आणि स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठी आपल्याला अधिक सजग राहावे लागेल,'' असे ते म्हणाले. हुतात्मा उद्योग समूहाचे संस्थापक क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कॉंग्रेसचे नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात अध्यक्षस्थानी होते. वैभव नायकवडी यांनी प्रास्ताविक केले.

दिल्ली विद्यापीठाचे निवृत्त प्राध्यापक डॉ. गोपाळ गुरू म्हणाले, ''संपूर्ण स्वातंत्र्याची लढाई अजून बाकी आहे. शेतकरी, कष्टकरी, कामगार, धरणग्रस्त, दुष्काळग्रस्त, महिला आणि पिचलेल्या घटकांना स्वातंत्र्य मिळत नाही, तोपर्यंत ते अपुरे आहे. क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांनी सुरू केलेली सामाजिक बांधिलकीची लढाई आपल्याला पुढे न्यायची आहे.''

आमदार विश्वजित कदम म्हणाले, ''नागनाथअण्णा नायकवडी आणि पतंगराव कदम यांचा जिव्हाळा मोठा होता. अनेक बिकट प्रसंगी अण्णांनी आम्हाला आधार दिला आहे.''

विशाल पाटील म्हणाले, ''नागनाथअण्णा नायकवडी यांनी वसंतदादा घराण्याशी जोडलेला ऋणानुबंध पुढेही मजबूत राहील.''

बाळासाहेब थोरात म्हणाले, ''देशाची वाटचाल कोणत्या दिशेने सुरू आहे, याची पडताळणी करण्याची गरज आहे. आपण कधी त्याचा विचार करून अस्वस्थ .होत नाही. आपण अस्वस्थ होणार नसेल तर आपला भविष्यकाळ अस्वस्थ असेल. लोकशाही, राज्यघटना, संस्कृतीच्या संरक्षणासाठी प्रत्येकाने तयार राहिले पाहिजे.''

गौरव नायकवडी, ॲड. सुभाष पाटील, प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगचे के. जी. पाटील, शिवसेनेचे अभिजित पाटील, कॉंग्रेसचे बाळासाहेब पाटील, आर. एस. चोपडे यांच्यासह नागनाथअण्णा नायकवडी यांच्या विचारांवर प्रेम करणारे शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

